# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## पर्यावरण विभाग

## जाहिर आवाहन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका गणेशोत्सव २०२३ मार्गदर्शक सुचना वर्षभरातील सर्व सण उत्सव पर्यावरणपुरक साजरा करण्यासाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक १२/५/२०२० रोजी मार्गदर्शक सुचना अधिसुचित केल्या असुन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या निर्देशानुसार "गणेशोत्सव सन-२०२३ रोजीच्या मार्गदर्शन सुचना" तयार करण्यात आल्या असुन, त्या खालीलप्रमाणे आहेत

१) घरगुती श्री गणेशमुर्तीची उंची ४ फुटापर्यंत असावी. तसेच घरगुती गणपती मुर्ती शाडूची माती किंवा अन्य पर्यावरण पुरक साहित्यानेच घडविणे बंधनकारक आहे.

२) सर्व घरगुती श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात /खाडीमध्ये, रहिवाशी संकुलात करणे अथवा मुर्ती स्विकृती केंद्रामध्ये देणे बंधनकारक आहे.

३) गणेशमुर्तीकारांना मुर्ती घडविणेसाठी/ उभारण्यासाठी प्रभाग कार्यालयामार्फत परवानगी देण्यांत येईल.

४) गणेशमुर्ती साठवणूकदारांनी देखील प्रभाग कार्यालयामार्फत परवानगी घेणे बंधनकारक राहील.

५) शाडूची माती / पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणाऱ्या मुर्तीकारांना यावर्षी प्रायोगिक तत्वावर उपलब्धतेनूसार महानगरपालिकेची जागा प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य या तत्वावर नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यांत येईल, त्यासाठी त्यांनी अर्ज करणे बंधकारक राहील. तसेच शाडूची माती नियमानूसार देण्यात येईल.

६) शाडूची माती /पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांनी जागेसाठी अर्ज केल्यास ते स्वत:मुर्तीकार असणे बंधनकारक आहे. तसे हमीपत्र त्यांनी सादर करणे आवश्यक आहे.

७) शाडू माती / पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांना या वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर महानगरपालिकेतर्फे निशुल्क उपलब्ध देण्यात आलेली जागा नवरात्री उत्सवाच्या समाप्तीपर्यंत मर्यादित कालावधीसाठी देण्यात येणार आहेत, सदर कालावधीच्या समाप्तीनंतर जागा पुन:श्च महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.

८) शाडूची माती / पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणारे मुर्तीकार / साठवणुकदार यांनी ते शाडू पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणार / साठविणार असल्याबाबतचे हमीपत्र महापालिकेला देणे बंधनकारक आहे.

९) शाडूची माती / पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांनी त्यांच्या मंडपाबाहेर दर्शनिय भागावर पर्यावरणपुरक साहित्याने घडविलेल्या मुर्ती उपलब्ध आहेत. असा ३ X ५ आकाराच्या फलक लावणे बंधनकारक आहे.

१०) मुर्तीकार/ साठवणुकदार सन २०२३ च्या आगामी गणेशोत्सवासाठी किती मुर्ती घडविणार /साठविणार आहेत, याची माहिती महानगरपालिकेला सादर करतील. ऊंच ४ फुटापर्यंतच्या घरगुती/सार्वजनिक सर्व मुर्ती शाडूची माती पर्यावरणपुरक साहित्याने घडविणे बंधनकारक आहे. वास्तव ते २०२३ मध्ये ४ फुटापर्यंतच्या किती मुर्ती घडविणार / साठविणार आहेत याची माहिती याशिवाय जर सन २०२३ मध्ये ४ फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मुर्ती घडविणार /साठविणार असल्यास, त्यापैकी किती मुर्ती शाडू / पर्यावरणपुरक साहित्याने व किती मुर्ती पिओपीपासुन घडविणार /साठविणार आहेत, याची माहिती देखील महापालिकेच्या संबंधित विभागास कार्यालयास सादर करावित.

११) मुर्तीकारांना / शाडूची माती / पर्यावरणपुरक साहित्याने घडविलेल्या मुर्तीच्या पाठीवर उजव्या खांदयाच्या जागी हिरव्या रंगाचे १ इंच एवढया आकारमानाचे वर्तुळ अशी खुण करावी, तर पिओपीपासुनच्या मुर्तीच्या पाठीवर उजव्या खांदयाच्या जागी लाल रंगाचे १ इंच एवढया आकारमानाचे वर्तुळ अशी खुण करावी. साठवणुक कर्त्यांनी देखील ते साठवणुक करत असलेल्या मुर्तीच्या पाठीवर उजव्या खांदयाच्या जागी पर्यावरणपुरक किंवा पिओपी साहित्याशी संबंधित असलेल्या रंगाचे वर्तुळ केलेले असेल याची खबरदारी घ्यावी.महानगरपालिकेच्या कार्यालयाचे पथक त्यांची प्रत्यक्ष भेट देऊन / पडताळणी करतील.

- पुजा व उत्सव साजरे करणा-या मंडळानी उपरोक्त सुचविलेल्या पर्यावरणपुरक बाबींचा वापर करावा.
- रंगासाठी हळद, चंदन, गेरूचा वापर करावा.
- पुजेसाठी फुले, वस्त्र, इ. पुजा साहित्य पर्यावरणपुरक असावे.
- काच धातुपासुन बनविलेल्या ताट- वाट्यांचा वापर करावा.
- प्लेटसाठी केळी व इतर पानांच्या पत्रावळींचा वापर करावा. एकवेळ वापराचे प्लास्टिक प्लेट साहित्य वापरु नये.
- पुजा व उत्सव मंडळाने स्थानिक स्वराज्य संस्थेने परवानगी दिलेल्या मुर्तीकार / साठवणुकदार यांच्याकडुन मुर्ती प्राप्त कराव्यात.
- पुजा मंडळांना स्थानिक स्वराज्य संस्थाकडुन परवानगी घेऊनच व मुर्ती विसर्जनाचा आराखडा देऊन एक महिनापुर्वी परवानगी प्राप्त करावी.

१२) शाडूची माती / पर्यावरणपुरक साहित्याने मुर्ती घडविण्याचे / साठविण्याचे वेळोवेळी देण्यात आलेले निर्देश सन २०२३ च्या नवरात्री उत्सवा दरम्यान देखील लागु राहील, व त्यासाठी स्वतंत्र निर्देश / परिपत्रक / जाहिरात देण्यात येणार नाही.

१३) सन. २०२३ च्या सार्वजनिक उत्सवा संदर्भात वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार संबंधित कारवाईस पात्र ठरतील.

( अजय वैद्य )

प्रशासक तथा आयुक्त

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner